दिनांकः-१३.०२.२०२०

## प्रेसनोट

विषयः- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातर्फे विशेष बाल पोलीस पथकाचे प्रशिक्षणार्थ एक दिवसीय कार्यशाळेचे ॲटो-क्लस्टर येथे आयोजन.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात मा. पोलीस आयुक्त श्री. संदीप बिष्णोई यांचे संकल्पनेतुन प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर एक याप्रमाणे "विशेष बाल पोलीस पथक" स्थापन करण्यात आलेले आहे. या विशेष बाल पोलीस पथकामध्ये प्रत्येकी ०१ पोलीस अधिकारी व किमान ०३ पोलीस कर्मचारी या प्रमाणे १५ पोधिकारी व ४५ कर्मचारी यांचा समावेश आहे. तर या सर्व पथकांचे नियंत्रण प्रमुख सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा मा. श्री. आर. आर. पाटील हे समन्वयक म्हणुन काम पाहत आहेत. या सर्व पथकांचे प्रशिक्षणार्थ एक दिवसीय कार्यशाळा आज ॲटो क्लस्टर येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विशेष बाल पथकातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी हे हजर होते तर त्यांना मार्गदर्शन करणेसाठी श्री. जैद सय्यद, प्रकल्प अधिकारी, बाल न्याय प्रकल्प, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई, श्री. विजय बावीस्कर, सामाजिक कार्यकर्ते, बाल सुरक्षा क्षेत्र व श्री. मोरे, ॲडव्होकेट, प्रथमवर्ग न्यायालय, मोरवाडी, पिंपरी हे उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन मा. श्री. संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे हस्ते झाले. सोबत प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड हे उपस्थित होते. या प्रसंगी मा. पोलीस आयुक्त साहेबांनी उपस्थित विशेष बाल पथकातील अधिकारी व कर्मचा-यांना मार्गदर्शन केले की, एक पोलीस म्हणुन आपणा सर्वांना समाजाचे ऋण फेडण्याची संधी मिळाली आहे. पोलीस ठाणेच नव्हे तर इतरत्रही बालकांप्रती आपला दृष्टीकोन चांगला व मदतीस तत्पर असाच ठेवावा. या पथकात काम करीत असतांना आपण एखाद्या जरी बालकास बाल-गुन्हेगारी पासुन परावृत्त करुन त्याच्या उर्जेस सकारात्मक दिशा देवु शकलात तरी ती तुमच्यासाठी या सेवेतील एक मोठी उपलब्धी असेल. त्यातुन तुम्हाला जे समाधान लाभेल ते अवर्णनीय असेल. नजरचुकीने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे संपर्कात आलेली झोपडपट्टी परिसरातील व व्यसनाधीनतेकडे वळलेली बालके यांचे समुपदेशन करावे. सामाजिक संस्थांच्या मदतीने पुनर्वसन करावे. शक्य तेवढे रोजगार मेळावे आयोजित करावेत असे सांगितले. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. आर. आर. पाटील, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. श्रीधर जाधव, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी केले.

संपुर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सुधाकर काटे, पोलीस निरीक्षक, सायबर सेल, पिंपरी चिंचवड यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजनासाठी सपोनि- दिपाली मरळे, एमओबी/पीसीबी, गुन्हे शाखा, सपोफौ-गंगाधर नाईकरे, पोहवा- कैलास बोबडे व पोहवा- संतोष बर्गे, सर्व नेमणुक- सपोआ, गुन्हे यांचे कार्यालय, पोहवा- राजेश परंडवाल, मपोना- सुधा टोके, पोशि- संजय भोसले, मपोशि- नम्रता सकट, सर्व नेमणुक- एमओबी, गुन्हे शाखा यांनी विशेष परिश्रम घेतले.

पोलीस निरीक्षक
एमओबी, गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड


पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
विशेष बाल पोलीस पथक प्रशिक्षण कार्यक्रम

